## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठच्या 'केसीआयआयएल' (KCIIL) केंद्राच्या सहाय्याने विकसित करण्यात आलेल्या 'वूम त्रा' (WomTra) या विशेष ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मचे अनावरण करण्यात आले. विशेष म्हणजे, जळगाव येथील १९ वर्षीय तरुण उद्योजक काशीफ अहमद शेख बदरुद्दीन यांनी या प्लॅटफॉर्मची निर्मिती केली असून, हे व्यासपीठ १०० टक्के महिला व्यापारी आणि विक्रेत्यांसाठी समर्पित असणार आहे.

महिला उद्योजिकांना आपल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी बाहेर जावे लागणे ही मोठी अडचण लक्षात घेऊन काशीफ अहमद यांनी महिलांना घरबसल्या जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'वूम त्रा' (WomTra) विकसित केले आहे. महिला उद्योजिका, हस्तकला निर्माती आणि गृहउद्योग चालविणाऱ्या महिलांना सुरक्षित, स्वतंत्र आणि विश्वासार्ह बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आले.

या ऑनलाइन प्लॅटफॉर्मचे उद्घाटन केसीआयआयएलचे संचालक डॉ. राजेश जावळेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नविन खंडारे प्रमुख उपस्थित होते. अवघ्या १९ वर्षांच्या तरुणाने सामाजिक जाणीवेतून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उचललेल्या या पावलाचे मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

पारदर्शक व्यवहार, सुलभ नोंदणी प्रक्रिया आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनांची खात्री ही 'WomTra' प्लॅटफॉर्मची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे सांगण्यात आले. संस्थापक काशीफ अहमद यांनी महिला उद्योजिकांना [womtra.in] या संकेतस्थळावर नोंदणी करून आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्याचे आवाहन केले आहे. याप्रसंगी इन्क्युबेशन मॅनेजर अनिकेत पठाडे, पोर्टफोलिओ मॅनेजर योगेश पाटील, कार्यक्रम समन्वयक रोशनी जैन तसेच कनिष्ठ लेखा व प्रशासकीय अधिकारी चैतन्य मनुधणे उपस्थित होते.

.....................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १९ मे, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता